**महाराष्ट्र शासन**
**सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव**
अल्पसंख्याक विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

क्रमांक:अशैसं-२००८/११२/(३२)/प्र.क्र.३५९/२००८/का.१, दिनांक :- २५ जून, २००९.

## अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र

रिझवी एज्युकेशन सोसायटी, रिझवी एज्युकेशनल कॉम्प्लेक्स, ऑफ कॉर्टर रोड, वांद्रे (प), मुंबई या शैक्षणिक संस्थेने त्यांच्या संस्थेस धार्मिक अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी दिनांक ११.७.२००७ रोजी सादर केलेल्या अर्जास अनुसरुन तत्कालीन सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी-२, सामान्य प्रशासन विभाग यांनी संबंधित संस्थेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या सुनावणीअंती दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ रोजी सदर संस्थेस शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:असंस-२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६/३५, दि.११ जून, २००७ अन्वये विहित केलेल्या तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील तीन वर्षाकरिता धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याक दर्जा प्रदान केला होता.

शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, क्रमांक:अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ च्या परिच्छेद (१०) मध्ये विहित तरतूदीनुसार सदर संस्थेने सादर केलेल्या दिनांक ९.९.२००८ च्या अर्जास अनुसरुन रिझवी एज्युकेशन सोसायटी, रिझवी एज्युकेशनल कॉम्प्लेक्स, वांद्रे (प), मुंबई या शैक्षणिक संस्थेस याद्वारे धार्मिक (मुस्लिम) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून घोषित करण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र केवळ महाराष्ट्र राज्यापुरते लागू असेल. सदर संस्थेस प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा संस्था संचालित करत असलेल्या सर्व शैक्षणिक शाखांना लागू राहील.

उपरोल्लेखित शैक्षणिक संस्थेस याद्वारे प्रदान करण्यात आलेला धार्मिक अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असेल. संबंधित संस्थेने अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, क्र.अशैसं-२००८/प्र.क्र.१३३/२००८/का.१, दि.४ जुलै, २००८ अन्वये विहित करण्यात आलेल्या निकष व अटींची सातत्याने व विनिर्देशपूर्वक पूर्तता करणे बंधनकारक राहील.

टी. एफ. थेकेकरा
**( टी. एफ. थेकेकरा )**
सक्षम प्राधिकारी तथा प्रधान सचिव,
अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

अल्पसंख्याक विकास विभाग
महाराष्ट्र शासन

TRUE COPY
Dr. Spoty Karthik
M. Sc, M.Ed, M.A. NET,
PhD Education
Principal

RIZVI COLLEGE OF EDUCATION
MUMBAI